**प्रेस नोट दि. ११/११/२०१९**

## सोलापूर ग्रामीण पोलीस दल

## वेग मर्यादेचे उल्लघंन केल्यास घरपोच मिळणार दंडाची नोटीस

०००००० 

यात निवेदन असे की, मा. सर्वोच्च न्यायालय स्थापित केलेल्या रस्ता सुरक्षा समितीने सन २०२० पर्यत प्राणांतिक अपघाताचे प्रमाण ५० टक्के कमी करण्याच्या उद्देशाने अपघातास कारणीभूत असणारे महत्वाच्या कारणापैकी भरधाव वेगाने वाहन चालविणे, दारू पिवून वाहन चालविणे, विना हेल्मेट चालक, शिटबेल्ट न वापरणे व इतर वाहनचालकांवर प्रभावीपणे कारवाई करणेकरीता सोलापूर ग्रामीण दलास अत्याधुनिक साधनसामुग्री असणारे (Interceptor Vehicle)वाहन मा. अपर पोलीस महासंचालक (वाह) यार्चेकडून पुरविण्यात आले असून सदर वाहनामध्ये गाडीची वेग मर्यादा, ब्रिथ अनॉलायझर, गाडीच्या काचेवरील फिल्मची जोडणारे मशिन (टेंन्ट मिटर) इत्यादी सुविधा आहेत. यापुढे महामार्गावर वेग मर्यादेचे उल्लघंन केल्यास संबंधीतास घरपोच नोटीस दिली जाणार आहे. त्याअनुशंगाने मा. अपर पोलीस महासंचालक (वाह)म.रा.मुंबई यांनी त्यांना असलेल्या अधिकाराचा अधिकाराचा वापर करून महाराष्ट्रातील रस्त्याकरीता वाहनांच्या वर्गानुरूप महत्तम वेग मर्यादाबाबत दिनांक २५/१०/२०१९ रोजी अधिसुचना निर्गमित केलेली आहे. सदरची अधिसुचना दिनांक १८/११/२०१९रोजी पासून पुढील आदेशापर्यत लागू राहणार आहे.

सदर व्हॅन मधील मशीन शंभर मीटर परिसरातील वाहनांची वेगमर्यादा ओलांडणा-या गाडीचा क्रंमाक कॅप्चर करते. हा क्रंमाक कंट्रोलकडे जातो. तेथून संबंधीत गाडी मालकास दंडाची नोटीस घरपोच जाणार आहे. त्याशिवाय त्याच्या मोबाईल क्रंमाकावर संदेशही जाणार आहे. अनेक लोक गाडीच्या काचेला फिल्मींग **(डार्क ग्लास)** करतात त्याची जाडी मोजण्याचे मशिनही या व्हॅनमध्ये आहे. अशा प्रकारची गाडी दिसल्यास त्याची तपासणी करून जागेवरच दंडाची नोटीस देण्यात येणार आहे. मदयप्राशन करून वाहन चालविणा-या वाहन चालका विरुध्द दंडात्मक कारवाई करता येते. एंकदर या व्हॅनमुळे वाहतूक नियंत्रण आणि नियमांचे उल्लंघन करणा-यांवर कडक कारवाई करता येणार आहे.

तरी यापुढे सर्व वाहन चालकांना पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण तसेच जिल्हा वाहतूक शााखा सोलापूर ग्रामीण यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे की मा. अपर पोलीस महासंचालक (वाह)म.रा.मुंबई यांनी त्यांना असलेल्या अधिकाराचा अधिकाराचा वापर करून महाराष्ट्रातील रस्त्याकरीता वाहनांच्या वर्गानुरूप महत्तम वेग मर्यादाबाबत दिनांक २५/१०/२०१९ रोजी अधिसुचनेनुसार दिनांक १८/११/२०१९ रोजी पासून सोलापूर ग्रामीण जिल्हयात अत्याधुनिक साधनसामुग्री असणारे (Interceptor Vehicle)वाहनाच्या माध्यमातून कारवाई करण्यास प्रांरभ होणार आहे तरी सर्व वाहन चालकांनी वरील नमुद कारणांचे **(वेगमर्यादेचे उल्लंघन, काळी फिल्म, मदयप्राशन करूण वाहन चालविणे** ) उल्लघंन न करता वाहतुकीच्या नियमांचे पालन करून सुरक्षित प्रवास कसा होईल याची दक्षता घ्यावी.

**सोबत:-** मा. अपर पोलीस महासंचालक (वाह)म.रा.मुंबई यांनी दि. २५/१०/२०१९ रोजी काढलेली अधिसुचना

(अतुल झेंडे )
**अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण**

प्रती,

मा.संपादक ..........

तरी सदर बातमी आपले लोकप्रिय दैनिक वर्तमान पत्रातून प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर

अपोमस(वा)/४५/नियो/३१०५ /१९
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, जुने जकात घर, ४ था मजला,
डि.डि.इमारत, शहीद भगतसिंग मार्ग,
मुंबई - ४००००१
दिनांक:- २५/१०/२०१९ 25 OCT 2019

वाचावे :- १) मोटर वाहन अधिनियम १९८८ चे कलम ११२ मधील तरतुदी
२) अधिसूचना क्र. एम.व्ही.ए.०५८९/सीआर-१०६१-टीआरए-२, दि. १९/०५/१९९० आणि महाराष्ट्र शासन राजपत्रा मधील प्रसिध्द कण्यात आलेले असाधारण, भाग चार-अ, परिशिष्ट, दिनांक ३०/०९/२००२
३) रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसूचना क्र. १३७७, दिनांक ०६/०४/१९९८

# अधिसूचना

ज्याअर्थी रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांनी मोटर वाहन अधिनियम १९८८ चे कलम ११२ चे उपकलम (१) (१९८८ चा ५९) मधील तरतूदीनुसार संदर्भित अधिसूचना का.आ. १५२२ (अ) अन्वये देशातील विविध रस्त्यांकरिता वाहनांच्या वर्गानुरूप महत्तम वेग मर्यादा निश्चित केली आहे.

०२. ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालय रस्ते सुरक्षा समिती यांनी रस्ते अपघात आणि त्यामध्ये होणाऱ्या मृत्यूंमध्ये दरवर्षी १० टक्के घट करणेबाबत निर्देश दिलेले आहेत;

०३. ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील रस्ते अपघातांचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले आहे की, सुमारे ३० टक्के प्राणांतिक अपघात हे वाहन चालक यांनी भरधाव वेगाने वाहन चालविल्याने होतात. महाराष्ट्र राज्यातील विविध रस्त्यांची भौगोलिक परिस्थीती, भूप्रदेश, घाट रस्ते, वळण रस्ते, समतल रस्ते आणि रस्त्याचा चढ उतार इत्यादी बाबींचा सांगोपांग विचार करून प्राणांतिक अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी, तसेच सार्वजनिक सुरक्षेसाठी वाहनांच्या वर्गानुसार महत्तम वेग मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे.

०४. त्याअर्थी, मोटर वाहन अधिनियम, १९८८ चे पोट कलम ११२ (२) सोबत अधिसूचना क्र. एम.व्ही.ए.०५८९/सीआर-१०६१-टीआरए-२, दि. १९/०५/१९९० आणि महाराष्ट्र शासन राजपत्रा मधील प्रसिध्द कण्यात आलेले असाधारण, भाग चार-अ, परिशिष्ट, दिनांक ३०/०९/२००२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून मी विनय कारगांवकर, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई महाराष्ट्रातील रस्त्याकरिता वाहनांच्या वर्गानुरूप महत्तम वेगमर्यादा सोबतच्या तक्त्याप्रमाणे निश्चित करीत आहे.

०५. या अधिसूचनेमध्ये निर्दिष्ट केलेल्या महत्तम वेगापेक्षा वाहनाची गती ५ टक्के पर्यंत अधिक आढळून आल्यास मोटर वाहन अधिनियम, १९८८ कलम १८३ अन्वये दखल घेण्यात येऊ नये.

०६. सदरची अधिसूचना आज दिनांक २५/१०/२०१९ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

०७. सदरची अधिसूचना दिनांक १८/११/२०१९ रोजी पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहील.

ADDL. DIRECTOR GENERAL OF POLICE (TRAFFIC) M.S. MUMBAI
सत्यमेव जयते

(विनय कारगांवकर)
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांवर वाहनांसाठी अनिवार्य करण्यात आलेली वेग मर्यादा कि.मी/प्रतितास**

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | प्रवेश नियंत्रण असलेले द्रुतगती मार्ग | | राष्ट्रीय/राज्य महामार्गावर ४ (२+२) अथवा जास्त मार्गिका असणारे विभाजीत (रस्त्याच्या मध्य भागी विभाजक असलेला) मार्ग | | महानगरपालिका कार्यक्षेत्रा मधील द्रुतगती मार्ग आणि ६ (३+३) मार्गिका असणारे विभाजीत रस्ते | | राष्ट्रीय/राज्य महामार्गावर २ अथवा जास्त मार्गिकेचे विभाजक नसलेले रस्ते व महानगरपालिका कार्यक्षेत्रा मधील ४ (२+२) मार्गिका असणारे विभाजीत रस्ते | | नगरपालिका क्षेत्रातील रस्ते/इतर रस्ते | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग (लागू असल्यास) | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग |
| (१) | (२) | (३) | | (४) | | (५) | | (६) | | (७) | |
| १ | प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकासह ८ प्रवासी यांचे वाहतुकीसाठी केला जातो. (एम १ श्रेणीतील वाहने) | १०० | ५० | ९० | ५० | ८० | ४० | ७० | ४० | ६० | ४० |
| २ | प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकासह ९ किंवा त्यापेक्षा जास्त प्रवासी यांचे वाहतुकीसाठी केला जातो. (एम २ आणि एम ३ श्रेणीतील वाहने) | ८० | ४० | ८० | ४० | ६० | ४० | ६० | ४० | ५० | ३० |
| ३ | मोटार वाहने ज्यांचा उपयोग माल/सामान वाहतुकीसाठी केला जातो. (सर्व एन श्रेणीतील वाहने) | ८० | ४० | ८० | ४० | ६० | ४० | ६० | ४० | ४० | ३० |
| ४ | दुचाकी मोटर वाहने | परवानगी नाही | परवानगी नाही | ७० | ४० | ६० | ४० | ६० | ४० | ५० | ४० |
| ५ | चारचाकी मोटर रिक्षा | परवानगी नाही | परवानगी नाही | ६० | ४० | ६० | ४० | ६० | ४० | ४० | ३० |
| ६ | तीनचाकी मोटर वाहने/ रिक्षा | परवानगी नाही | परवानगी नाही | ६० | ४० | ५० | ४० | ५० | ४० | ४० | ३० |

टिप :-१) ज्या वळण रस्त्याची त्रिज्या ५० मीटरपेक्षा कमी आहे अशा सर्व रस्त्यांवर वाहनांचा वेग ताशी ३० कि.मी. निश्चित करण्यात येत आहे.

२) सर्व रस्त्यांवरील बोगदयामध्ये वेग मर्यादा ताशी ८० कि.मी. निश्चित करण्यात येत आहे.

३) नियम ११८, केंद्रीय मोटर वाहन नियम १९८९ मध्ये नमूद केल्यानुसार परिवहन संवर्गातील वाहनांना वेग नियंत्रकाच्या (Speed Governor) अटी लागू राहतील.